**CNR No.MHWR030009882022**
**नि. फौ. ख. क्र. १४२/२०२२**
**सरकार / प्रमोद**
**नि.क्र. १६**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ ची शपथेवर साक्ष**

मी सत्य प्रतिज्ञेवर सांगतो की —

माझे नाव : शैलेश मधुकरराव चाफलेकर,

वय : ५० वर्षे, व्यवसाय : पोलिस हवालदार, ब.नं. ६९७,
नेमणुक : वर्धा शहर पोलिस स्टेशन, जि. वर्धा.
रा. : पोलिस क्वॉर्टर, वर्धा, ता. जि. वर्धा.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एस. पठाण मार्फत**

१. मी दि. ०२/०१/२०२२ रोजी वर्धा शहर पोलिस स्टेशन येथे पोलिस हवालदार, ब.क्र. ६९८ या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी प्रभारी पोलिस स्टेशन अधिकारी सहायक फौजदार श्री. राजु वैरागडे होते. त्यादिवशी मला वरिष्ठांचे लेखी आदेशाने गुन्हा क्र. ०३/२०२२ भा.दं.वि. चे कलम ३२४ व ५०४ चा तपास मिळाला होता. मला केस डायरीसोबत तोंडी रिपोर्ट, फिर्यादपत्र, डॉक्टर तहरीर व मेडिकल रिपोर्ट हे दस्त मिळाले होते. सदर गुन्हयाची फिर्याद श्री. वैरागडे यांनी घेतली होती.

२. मी तपासादरम्यान सिध्दार्थ नगर, वर्धा येथे फिर्यादीचे घरासमोर घटनास्थळावर गेलो होतो. तेथे मी लेखी सुचनापत्र देवून दोन पंचाना बोलविले होते. सदरचे सुचनापत्र अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास **नि.क्र. १७** देण्यात येते. त्यानंतर मी तेथे पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला होता. सदरचा पंचनामा अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास **नि.क्र. १८** देण्यात येते.

३. त्यानंतर मी फिर्यादी व साक्षीदारांचे बयाण नोंदविले होते. त्यानंतर मी आरोपीचा शोध घेवून त्याला सुचनापत्र दिले होते. त्याबाबतची स्टेशन डायरी नोंद अभिलेखावर दाखल आहे. आरोपीने मला गुन्हयात वापरलेला चाकु त्याचे घरून काढून दिला होता. त्याबाबत मी पंचासमक्ष जप्ती पत्रक तयार केले होते. ते अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी, आरोपी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास **नि.क्र. १९** देण्यात येते.

४.  मी सदर जप्त केलेला चाकु बघितल्यावर ओळखू शकतो. *(दोन्ही पक्षांच्या उपस्थित साक्षीदारास न्यायालयात दाखल सिलबंद मुद्देमाल जी.पी. क्र. १२/२०२४ उघडून दाखविण्यात आला.)* हा तोच चाकु आहे. त्याचे सिलवर माझी, आरोपी व पंचाची सही आहे. करीता त्यास **प्रदर्श अ** देण्यात येते. त्यानंतर मी सदर जप्त चाकुची क्युरी करण्याकरीता डॉक्टरांना तहरीर दिली होती. ती अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी सही असून डॉक्टरांची प्राप्त म्हणून सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास **नि.क्र. २०** देण्यात येते. त्याबाबत प्राप्त क्युरी रिपोर्ट अभिलेखावर दाखल आहे.

५.  मी साक्षीदारांचे बयाण त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. सा.क्र. ३ आशिष याने मला बयाण देतांना त्याचे बयाणातील लाल शाईने अधोरेखित भाग अ सांगितला होता. तो त्याचे सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात आला असून त्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. करीता त्यास **नि.क्र. २१** देण्यात येते. मला तपासामध्ये आरोपीने फिर्यादीचे घरी जावून त्याला काखेमध्ये चाकुने मारहाण करून दुखापत केल्याचे आणि दमदाटी केल्याचे निष्पन्न झाले होते. त्यामुळे मी आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते.

६.  मी सदर आरोपीला बघितल्यावर ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे. *(साक्षीदाराने न्यायालयात उपस्थित आरोपीकडे बोट दाखविले.)*

**सर तपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. एम. डब्ल्यु. बेग मार्फत</u>**

७.  हे म्हणणे खरे नाही की, मला प्रस्तुत प्रकरणाचा तपास मिळण्यापुर्वीच सदर गुन्हयात तपास सुरू झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला तपासादरम्यान आरोपीला खोटया प्रकरणात फसविण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले नव्हते.

८.  आरोपी व फिर्यादी यांच्या घरांमध्ये अंदाजे दोन घरे अंतर आहे. ते एकमेकांचे नातेवाईक असल्याबाबत मला माहिती नाही. मला तपासादरम्यान आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये जुना वाद असल्याचे आढळले नव्हते. प्रस्तुत प्रकरणापुर्वी फिर्यादीने आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दिल्याबाबत मला माहिती नाही.

९.		हे म्हणणे खरे नाही की, मी प्रकरणात स्वतंत्र व निष्पक्ष तपास न केल्यामुळे मला सदर बाबींची माहित नाहीत. मी घटनास्थळाच्या शेजारी राहणा—या लोकांचे बयाण नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रदर्श अ वरील वस्तुला मुठ नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरचा मुद्देमाल / शस्त्र आरोपीकडून जप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर न जाता पोलिस स्टेशनमध्ये बसून खोटा पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मला तपासाअंती आरोपीने कोणताही गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले होते आणि तरीही मी फिर्यादीचे सांगण्यावरून खोटा तपास करून खोटे दोषारोपपत्र सादर केले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

सा. वा. दा. ब. अ. क. के.

न्यायदंडाधिकारी, प्र.व., वर्धा
दिनांक : २९/०१/२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.01.29 16:27:54 +0530

( वि. प्र. खंदारे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)